माहितीचा आधिकार अधिनियम-२००५ कलम ५ (१), ५ (२) अन्वये जन माहिती अधिकारी, सहायक जन माहिती अधिकारी, व कलम १९ (१) अन्वये अपिलिय प्राधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग

शासन निर्णय क्रमांकः : माअअ-२०१६/प्र.क्र.५/आस्थापना
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १६ जानेवारी, २०१६.

वाचा :-

१) सा.प्र.वि. शासन परिपत्रक क्रमांक : केमाअ २००५/प्र.क्र.१९०/०५/५, दि. १८ जून, २००५.
२) पर्यावरण विभाग, शासन आदेश क्र. आस्था-२००५/१९९३/प्र.क्र.२२३/का-३, दि. १६ सप्टेंबर, २००५.
३) पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. आस्था-२००५/प्र.क्र.२३३/२००५/का-३, दि. १२ नोव्हेंबर, २००७.
४) पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. आस्था-२०१३/प्र.क्र.६६/१३/आस्था., दि. १०सप्टेंबर, २०१३.
५) पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. आस्था-२०१३/प्र.क्र.६६/१३/आस्था., दि.२९ एप्रिल, २०१४.

शासन निर्णय :-

१) उपरोक्त संदर्भ क्रमांक (५) येथील आदेश अधिक्रमित करुन केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(१), ५(२) व १९(१) अन्वये पर्यावरण विभागातील सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नेमणूक सोबतच्या प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहेत.

२) सामान्य प्रशासन विभाग यांनी कळविल्याप्रमाणे माहिती अधिकारांतर्गत विहित विवरणपत्रामध्ये सर्व कार्यासन अधिकाऱ्यांनी दरमहा ५ तारखेपर्यंत, विभागातील आस्थापना कार्यासनाकडे (कार्यासन-३) माहिती पाठवावयाची आहे. काही वेळा संदर्भ/ अर्ज एकापेक्षा अधिक कार्यासनांशी संबंधीत असल्यास अशा वेळी ज्या कार्यासनाचे जास्त मुद्दे असतील अशा कार्यासनाने कमी मुद्दे असलेल्या कार्यासन/ कार्यासनांकडून माहिती घेऊन एकत्रितरीत्या माहिती पाठवावी. आस्थापना शाखेमार्फत माहिती अधिकाराचा वार्षिक अहवाल राज्य माहिती आयोगास पाठविण्यात येईल.

३) माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन झाल्यास, खोटी माहिती पुरविल्यास किंवा जनतेला सहकार्य न केल्यास इ.बाबींसाठी सदर अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी शिक्षेस पात्र ठरतील.

४) विभागाच्या नोंदणी शाखेत माहिती अधिकाराखाली प्राप्त अर्जासाठी एक स्वतंत्र नोंदवही ठेवावी व ज्या दिवशी अर्ज प्राप्त झाला त्याच दिवशी संबंधित अर्ज माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविण्याची व्यवस्था लिपिकाने करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११६१४५५३६८९०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATIBHA KIRAN MANGUDKAR

Digitally signed by PRATIBHA KIRAN MANGUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPT,CID - 918049, postalCode=400032, st=Maharashtra, cn=PRATIBHA KIRAN MANGUDKAR
Date: 2016.01.19 12:50:19 +05'30'

(प्र.कि.मंगुडकर)
शासनाच्या अवर सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई.
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई.
९. प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव (पर्यावरण), पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१२. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान सभा, मुंबई.
१३. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान परिषद, मुंबई.
१४. मुख्य आयुक्त, माहिती आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
१५. राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयुक्त कार्यालय, मुंबई.
१६. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
१७. सर्व मंत्रालयीन विभाग.
१८. सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-५,मंत्रालय, मुंबई.
१९. सर्व संबंधित अधिकारी, पर्यावरण विभाग, मुंबई.
२०. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२१. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२३. निवड नस्ती/ पर्यावरण विभाग.

माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ५(१),५ (२) व कलम १९ (१) अंतर्गत घोषित करण्यात आलेल्या राज्य सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी यांची यादी

अ.क्र.	**पदनिर्देशित सहायक जन माहिती अधिकारी**	**पदनिर्देशित जन माहिती अधिकारी**	**पदनिर्देशित शासकीय अपिलीय प्राधिकारी**	**कार्यासन दूरध्वनी क्रमांक**	**विषय**
१	श्री.वि.सु.पाटील, सहायक, कार्यासन-आस्थापना	श्रीम.प्र.कि.मंगुडकर, अवर सचिव, कार्यासन-आस्थापना	श्री.सो.ना.बागुल, सह सचिव, कार्यासन-आस्थापना व रोखशाखा	१५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन ,मंत्रालय, मुंबई. ०२२-२२७९३१३१	पर्यावरण विभागाची आस्थापना व सेवाविषयक बाबी (मंत्रालय खुद्द), विधीमंडळ समन्वय, प्रधान सचिव (पर्या) यांच्या साक्षीच्या बैठका, विभागाची आरक्षण विषयक अंमलबजावणी, पदस्थापना, सेवानिवृत्तीविषयक कामे, माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आस्थापना विषयक सर्व कामे, म.प्र.नि.मंडळाचे गठन / अध्यक्ष, सदस्य यांच्या नियुक्त्या.
२	श्री.सु.रा.किणी, सहायक, कार्यासन-रोखशाखा	श्री.वि.गो.कडू, कक्ष अधिकारी, कार्यासन -रोखशाखा	श्री.सो.ना.बागुल, सह सचिव, कार्यासन-आस्थापना व रोखशाखा	१५ वा मजला , नवीन प्रशासकीय भवन ,मंत्रालय, मुंबई. ०२२-२२७९३१३१	पर्यावरण विभागातील कर्मचा-यांच्या वेतन विषयक सर्व बाबी, अर्थसंकल्प तरतूदी तसेच वित्त विभाग व नियोजन विभागाशी समन्वय, विभागाचे लेखा परिक्षण/ लेखा आक्षेप, कार्यालयीन खर्च, कार्यालयासाठी सामग्रीची खरेदी करणे व इतर प्रदाने, कार्यक्रम अंदाजपत्रक व अंदाज समिती विषयक कामे, विनियोजन / ताळमेळ विषयक कामे
३	श्री.हि.सा.पेडणेकर, सहायक, कार्यासन-तां.क.१	१) श्री.द.सु.भालेराव, शास्त्रज्ञ श्रेणी-२, कार्यासन-तां.क.१ २) का.सु.लंगोटे, शास्त्रज्ञ श्रेणी-२, कार्यासन-तां.क.१	डॉ.भ.ना.पाटील, संचालक, कार्यासन-तां.क.१	१५ वा मजला , नवीन प्रशासकीय भवन ,मंत्रालय, मुंबई. ०२२-२२०२९३८८	राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ समिती (मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्राशी संबंधित), वातावरणीय बदल, पर्यावरण सेवा योजना, नदी कृती योजना, ध्वनी प्रदूषण नियम, नदी नियमन प्राधिकरण (आर.आर.झेड), अपील, इ., हरित इमारत / वसाहत नियम, पर्यावरण माहिती प्रणाली केंद्र (एन्व्हीस), गाडगीळ समिती, जल प्रदूषण, पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (इकोसेन्सेटिव्ह झोन)

४	श्री.प्र.तु.जमदाडे, सहायक, कार्यासन-ता.क.२	श्री.जॉय ठाकूर, शास्त्रज्ञ श्रेणी-२, कार्यासन-तां.क.२	श्री. शु.द.आहेर, उप सचिव, कार्यासन-तां.क.२	१५ वा मजला , नवीन प्रशासकीय भवन ,मंत्रालय, मुंबई. ०२२-२२८१९५१७	राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ समिती (मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्र वगळून महाराष्ट्रातील उर्वरित जिल्हे), राष्ट्रीय हरित न्यायधिकरण,पर्यावरण आघात मुल्याकंन अधिनियम, २००६ शी संबंधित न्यायालयीन प्रकरणे / उल्लंघन/ तक्रारी, वायू प्रदूषण.
५	श्री.वि.अ.नाईकवाडे, सहायक, कार्यासन-तां.क.३	१) श्री.चं.अ.विभूते, शास्त्रज्ञ श्रेणी-२, कार्यासन-तां.क.३ २) श्रीमती.अ.ब.शिर्के, शास्त्रज्ञ श्रेणी-२, कार्यासन-तां.क.३	श्री.अ.म.पिंपरकर, शास्त्रज्ञ श्रेणी-१, कार्यासन-तां.क.३	१५ वा मजला , नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई. ०२२-२२८५५०८२	राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, सृष्टी मित्र ॲवार्ड, जनजागृती, जिल्ह्यांचा सद्यःस्थितीचा पर्यावरण अहवाल, कृती आराखडा आणि CEPI संबंधित बाबी, राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना, सरदार सरोवर प्रकल्पाचे समन्वयन, हरित संकल्पना प्रकल्प, जिल्हा माहिती केंद्र व समित्या, राष्ट्रीय हरित सेना, पश्चिम घाट इको क्लब्स.
६	श्री.उ.बा.बाण्णव सहायक, कार्यासन-तां.क.४	श्री.दि.मा.सोनवणे, शास्त्रज्ञ श्रेणी-२, कार्यासन-तां.क.४	डॉ.भ.ना.पाटील, संचालक, कार्यासन-तां.क.४ (अतिरिक्त कार्यभार)	१५ वा मजला , नवीन प्रशासकीय भवन ,मंत्रालय, मुंबई. ०२२-२२८५२६९६	महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, सागर तटीय नियमन क्षेत्र (सि.आर.झेड.) अधिसूचना, सी.आर.झेड. शी संबंधित न्यायालयीन व राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाशी संबंधित प्रकरणे, जल प्रदूषण नियम अधिनियमाखाली अपिल, तिवरे (मॅनग्रोज), मासे मर्तूकीची भरपाई, इ., महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/सि.ई.टी.पी.शी संबंधित प्रकरणे, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण आणि मिठी नदी, कचरा व्यवस्थापन (नागरी घन कचरा., घातक, ई-कचरा, प्लॅस्टिक पिशव्या, जैव वैद्यकीय घन कचरा,इ.), मायनिंग, जेनेटीकली मोडीफाय ऑर्गनिझम रुल्स.